सन २०१८-१९ च्या खरीप हंगातील दुष्काळ घोषित केलेल्या मंडळातील तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील अभ्यासक्रमांकरीताचे विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन परिपत्रक क्र.बैठक-२०१८/प्र.क्र.४३२/तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन,मादाम कामा मार्ग ,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई .४०००३२
दिनांक : २९ डिसेंबर, २०१८

संदर्भ : १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक शुल्क-५२१८/ प्र.क्र.४१३/मशि-२, दिनांक ३ नोव्हेंबर,२०१८

२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.३८१/ तांशि- ४, दि. ०५ नोव्हेंबर, २०१८

३) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक शुल्क-५२१८/ प्र.क्र.४१३/मशि-२, दिनांक १७ नोव्हेंबर,२०१८

४) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.३८१/ तांशि-४, दि. २० नोव्हेंबर, २०१८

प्रस्तावना :

महसूल व वन विभागाने दिनांक २३ ऑक्टोबर, २०१८ व दिनांक ०६ नोव्हेंबर, २०१८ च्या शासन निर्णयाव्दारे राज्यातील सन २०१८ च्या खरीप हंगामातील काही तालुक्यांमध्ये व मंडळांमध्ये दुष्काळ जाहिर करुन काही सवलती जाहिर करण्यास मंजूरी दिली होती. यामध्ये शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी ही सवलत समाविष्ट आहे.

महसूल विभागाच्या शासन निर्णयास अनुसरुन उच्च शिक्षण संचालनालय व तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील विविध अभ्यासक्रमांकरीता विद्यापीठ/ महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत आवश्यक ते आदेश संदर्भ क्र.१ ते ४ येथील शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आले आहेत. त्याद्वारे राज्य शासनाने दुष्काळ घोषित केलेल्या गावातील विद्यार्थ्यांकडून संबंधित विद्यापीठाने / स्वायत्त संस्थेने / महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने कोणत्याही स्वरुपाचे परीक्षा शुल्क आकारु नये, या योजनेसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांकडून चालू शैक्षणिक वर्षासाठी परीक्षा शुल्क यापूर्वीच आकारले असेल तर

अशा विद्यापीठाने / स्वायत्त संस्थेने / मंडळाने सदर विद्यार्थ्यास परीक्षा शुल्क परत करावे याबाबत सविस्तर सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत सर्व विद्यापीठांना देखील स्वतंत्ररित्या कळविण्यात आले आहे.

**शासन परिपत्रक :**

उच्च शिक्षण संचालनालय व तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अभ्यासक्रमांकरीता शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये परीक्षा शुल्क माफीच्या योजनेखाली पात्र असलेल्या व चालू वर्षी राज्य शासनाने दुष्काळग्रस्त म्हणून जाहिर केलेल्या गावांतील रहिवासी असलेल्या विद्यार्थ्यांने तो त्या दुष्काळग्रस्त गावातील राहिवासी असल्याच्या पुराव्यासह परीक्षा शुल्क माफीसाठी संबंधित संस्थेकडे दि. १० जानेवारी, २०१९ पर्यंत अर्ज करणे आवश्यक राहिल. संबंधित संस्थेने असे अर्ज तपासून त्यांच्या शिफारशीसह संबंधित विद्यापीठाकडे / मंडळाकडे दि. १४ जानेवारी, २०१९ पर्यंत पाठवावेत. ज्या विद्यार्थ्यांकडून परिक्षा शुल्क विद्यापीठाने / मंडळाने यापूर्वी घेतले असेल तर सदर शुल्काची प्रसंगपरत्वे ५०% /१००% रक्कम विद्यापीठाने / मंडळाने दि. ३० जानेवारी, २०१९ पर्यंत संबंधित संस्थेमार्फत विद्यार्थ्यास परत करावी. सर्व विभागीय उच्च शिक्षण / तंत्र शिक्षण सह संचालकांनी याबाबतचा आढावा वेळोवेळी घ्यावा.

२. हे आदेश सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणण्यात यावेत.

(समीर ढेरे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कुलगुरु, सर्व अकृषी विद्यापीठे
कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, ता.माणगांव, जि.रायगड
सर्व जिल्हाधिकारी
संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत,४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये (सर्व), (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये (सर्व), (संचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत)
सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये (सर्व)
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर

महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर
महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
उप सचिव (मशि/विशि/अर्थसंकल्प), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
अवर सचिव (तांशि-३/ विशि-३), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
कक्ष अधिकारी (मशि-२/मशि-४/तांशि-५/तांशि-६/साशि-१), उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई
सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहायक
निवडनस्ती/तांशि-४